
पारावरच्या गप्पा

# शेतीसाठी विजेच्या उपलब्धतेचा प्रश्न गंभीर!



देवदर्शन आटोपून संपत पारावर बसला होता. आज गणपतला येण्यास उशीर झाला होता. गणपतही देवदर्शन घेऊन संपतजवळ येऊन बसला. त्याच्या एकूण चालण्यावरून आणि हावभावांवरून संपतच्या लक्षात आले की, आज गणपतची मानसिक स्थिती जरा बिघडलेली आहे! मात्र त्याला जास्त न डिवचता हसून संपत म्हणाला, ''कारं गंपा, झालं का देवदर्शन? बराच वेळ झाला तुझी वाट पाहत होतो. आता निघणारच होतो; परंतु तू येत असल्याचे बघून परत बसलो. कारं, लई उशीर केला?''

गणपत वैतागूनच म्हणाला, ''काही नाही रं संपा, आज लाईट येण्याचा सकाळचा वेळ होता ना... मी म्हटलं मोटार चालू करावी, बारं लावावं आणि यावं देवदर्शन आटोपून. पण कसलं काय? वेळेवर येईल ती काय लाईट हाय व्हय! मी बराच वेळ वाट बघितली. एकदाची आली लाईट आणि मोटार चालू केली; म्हटलं आता बारं बदलून निघावं पण वाफ्यामध्ये पाणी जाईपर्यंत पुन्हा लाईट गेली सुद्धा. बराच वेळ वाट बघितली. कंटाळून शेवटी दिला नाद सोडून आणि आलो देवदर्शनाला. आता जाऊन परत लाईटच्या मागे लागावं लागेल. दिवसा जर लाईट असली तर किती वेळ मोटार चालेल हे देवालाही सांगता येणार नाही. मग आपली काय गत! संपा, फार वैताग आला रे! एक तर हे उन्हाळ्याचे दिवस. ऊन नको नको म्हणतंय. पिकांनी तर पार माना टाकल्यात. लाईटवाले कधी मोटारीला लाईट देतील हे आपण सांगूच शकत नाही. हे असंच चाललं तर पिकांचं काही खरं नाही बघ! विहिरीत पाणी आहे पण लाईट नाही. बरं पिकाचे चांगले पैसा होत असते तर जनरेटर आणून पाणी दिलं असतं. पण आहे त्यातच शेती परवडत नाही. वरून कोठे खर्च वाढवून घ्यायचा? माझं तर पार डोकंच काम करेना बघ. काय करावं तेच कळत नाही.''

संपत फक्त ऐकत होता. कारण ही कहाणी फक्त गणपतचीच नाही तर संपूर्ण शेतकरी समाजाची आहे. घरोघरी मातीच्याच चुली या म्हणीप्रमाणे प्रत्येक शेतकरी हा विजेच्या प्रश्नाला सामोरा जात आहे. संपतकडे तर काही ठोस उपाययोजना नव्हती. परंतु गणपतच्या मनातील धगधगत्या विस्तवावर थोडीफार फुंकर मारणे हे त्याचे काम होते.

तो म्हणाला, ''हे बघ गंपा, हा प्रश्न काही फक्त तुझा आणि माझा नाहीच. खरं तर ही समस्याच कशी सुरू झाली याचा कोणीही विचार करत नाही. मागील अनेक दशकांपासून आपण पाण्यासाठी मोटारी चालवत होतो आणि त्यासाठीचे वीजबिलही आपण भरत होतो. पाहिजे तेवढी आणि पाहिजे तेव्हा वीजही मिळत होती. डीपीचा साधा फ्यूज गेला तरीही वायरमन येऊन फ्यूज टाकत होता. कधीही डीपी बदलण्यासाठी किंवा तिची दुरुस्ती करणे, त्यात ऑईल टाकणे यासाठी आपल्याला वर्गणी जमवावी लागत नव्हती. परंतु आज तर सर्व चित्रच बदलले. याला जबाबदार कोण? आपण, वीज कंपनी की आपले सरकार? याचा विचार आपण केला तरच हा प्रश्न सुटेल! या विजेच्या प्रश्नावर अनेकजण आपली पोळी भाजून घेत आहेत. जे पक्ष सत्तेत असतात ते वीज कनेक्शन तोडा, असे सांगतात आणि विरोधी पक्ष वीज कनेक्शन तोडते तर वीज कंपन्यांना बदडून काढा असे सांगतात. आपल्याला

वेळेवर आणि पूर्ण क्षमतेने लाईट मिळत नाही कारण वीज कंपनी सांगते तुम्ही बिल भरले नाही. आपण म्हणतो, आम्हाला सर्व प्रकारच्या चांगल्या सेवासुविधा द्या, नंतरच आम्ही वीज बिल भरण्याचा विचार करू. एक तर शेतीसाठी महागाची वीज घेऊन पीक घेणं परवडणार नाही हे सर्वांनाच माहीत आहे. या सर्व चर्चेमध्ये आणि चक्रव्यूहामध्ये विजेचा प्रश्न अडकला आहे. आज या चक्रव्यूहाचा कोण भेद करणार, भेद कधी होणार हे सांगणे मात्र माझ्या मते भगवंतालाही जमेल की नाही यात शंका आहे.''

आता तर गणपतने कपाळाला हात मारून घेत म्हटलं, ''आरं संपा, अनेक प्रश्नांबद्दल चर्चा केली की तू काहीतरी सांगतो, पण ते खरं होईल की खोटं माहीत नसतं... परंतु त्यामुळे मनाला एक प्रकारची उभारी येते. आता तर तूच जर तुझी तलवार म्यान केली मग पुढचं युद्ध कसं लढणार?''

हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा. हा प्रश्न सोडविण्याचा सर्वांनी मनापासून विचार केला तर एका चुटकीसरशी सुटू शकतो. परंतु या प्रश्नाचं घोंगडं जेवढं जास्त भिजेल तेवढा राजकारणी लोकांचा फायदाच आहे. खरं तर कर्जमाफी, वीजबिल माफी यासारख्या त्यांनी फेकलेल्या तुकड्यांवर आपण फार खुश असतो. अनेक निवडणुका अशा प्रकारच्या प्रश्नांवरच जिंकल्या जातात. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्याकडूनच पुढाकार घेतला जाणे महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्याला दिवसा वीज मिळाली पाहिजे, तीही पूर्ण क्षमतेने आणि अखंडित सेवा देत असताना होणाऱ्या बिघाडावर येणारा खर्च हा वीज कंपन्यांनीच केला पाहिजे. शेतीसाठी विजेचा दर अल्प प्रमाणात ठेवला तसेच प्रत्येक शेतकऱ्याला मीटर देऊन त्यानुसार विजेची आकारणी केली तर हा प्रश्न सुटेल. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे विजेचे बिल मीटरप्रमाणे आले तर शेतकरीसुद्धा पाण्याचा वापर योग्य प्रमाणातच करेल. दुष्काळी भागातील कोरडवाहू भागातील तसेच बागायती भागातील शेतकऱ्यांना त्यांची वापरलेल्या युनिटनुसार बिल आले आणि तेही माफक आले, तरी वेळेवर विजेचे बिल भरण्याची सवय त्यांना लावावी लागेल. अर्थात माफक बिल आले तर शेतकरी वीज बिल भरतीलही. अशा परिस्थितीमध्ये जे शेतकरी वीज बिल भरणार नाहीत त्यांचे मात्र वीज कनेक्शन बंद केले पाहिजे. पूर्ण डीपी बंद करण्याऐवजी त्यांचेच वीज कनेक्शन बंद केले तर त्यातून वेगळा संदेश जाईल. अर्थात अशा वेळी राजकीय हस्तक्षेप नको. ज्याप्रमाणे आपण घराचे लाईटबिल भरतो आणि ही गोष्ट आता अंगवळणी पडली आहे याच प्रकारे शेतीसाठी लाईट वापरताना आणि त्याचे त्याचे बिल भरताना एक प्रकारची शिस्त लावणे गरजेचे आहे. फुकट लाईट देणे किंवा लाईट बिल माफ करणे यासारख्या दुष्टचक्रातून जोपर्यंत शेतीची वीज बाहेर पडत नाही तोपर्यंत हे प्रश्न सुरूच राहणार आहेत. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे सौरऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पातळीवर वाढला तर सूर्याच्या माध्यमातून दिवसा तयार होणारी वीज शेतकरी शेतीसाठी दिवसा वापरतील. यामुळे दिवसाची वीज शेतीसाठी मिळेल. अनेकदा कारखाने दिवसा लाईट वापरतात. तसेच घरगुती वापरासाठी विजेचा वापरही दिवसा होतो. शेतीलाही लाईट दिवसाच द्यायची असेल तर दिवसा लाईटचा वापर वाढेल आणि रात्री कमी होईल. अतिरिक्त ताण आला तर लाईटचा ग्रीडमधील प्रवाह असंतुलित होतो. म्हणून रात्री इतर ठिकाणी विजेचा वापर कमी असल्यामुळे शेतीला रात्रीची लाईट दिली जाते. हा प्रश्न आपण सौर ऊर्जेच्या माध्यमातून सोडवू शकतो. अर्थात यासाठी ग्रामीण पातळीवर एक तर मोठे सोलर प्रोजेक्ट उभे राहिले पाहिजे किंवा सर्व शेतकऱ्यांना सोलर मोटारीसाठी मोठ्या प्रमाणात अनुदान दिले पाहिजे. दरवर्षी वीज बिल माफी करण्यापेक्षा एकदाच मोठा खर्च सौरऊर्जेवर केला तर हा प्रश्न कायमचा सुटू शकतो. अनेक प्रश्न उभे राहात असले तरी आणि त्या प्रश्नांची उत्तरेही मिळू शकतात. अर्थात प्रत्येक वेळी तो प्रश्न सोडविण्याची इच्छाशक्ती सर्वच घटकांची असावी लागते.''

गणपतने हसतच संपतला टाळी दिली व म्हणाला, ''संपा, खरी ग्यानबाची मेख इथेच आहे. आपण उगीचच विचार करत बसतो, आकांडतांडव करतो. परंतु हे उपयोगाचे नाही. आपणसुद्धा ज्यांच्याकडून हा प्रश्न सोडवून घ्यायचा आहे त्यांना जाब विचारण्यापेक्षा नको त्याच्या मागे लागतो. पण संपा, मला असे वाटते, आता हा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांनाच मनापासून प्रयत्न करावा लागेल. कारण लाईटचे घोंगडे आता फार भिजले आहे. जास्त भिजले तर ते विरून जाईल. राजकीय- सरकारी पातळीवर तसेच शेतकऱ्यांच्या पातळीवर गांभीर्याने विचार करून हा प्रश्न सुटेल अशी आशा करूया. चला उठा. संपा, बघावं लागेल लाईट आली की नाही, कारण आता तरी जशी परिस्थिती आहे तिला सामोरे तर जावेच लागेल.''

**(सौजन्य: 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**